महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
Maharashtra Housing & Area Development Authority
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

==============================================================

जावक क्रमांक - ४०२५ दिनांक :- ०७ ऑक्टोबर, २०२२

प्रसिद्धीपत्रक

# मुंबई मंडळातील अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या माहिती फलकांचे अनावरण

मुंबई, दि. ०७ ऑक्टोबर, २०२२ :- मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत कार्यरत अतिक्रमण निर्मूलन कक्षासमोरील दालनात नागरिकांना अतिक्रमण निर्मूलन विभागाची कामकाज पद्धती, नियमांची माहिती देणाऱ्या १२ फलकांचे अनावरण 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर यांच्या हस्ते नुकतेच म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात करण्यात आले.

यावेळी बोलताना म्हाडाचे उपाध्यक्ष श्री. अनिल डिग्गीकर यांनी अतिक्रमण निर्मूलन विभागातर्फे राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. यामुळे कामकाजातील पारदर्शकता आणि नागरिकांची प्रशासन आणि कार्यपद्धतीबद्दल सकारात्मक भावना निर्माण होण्यास मदत होऊ शकेल आणि गैरकायदेशीर कारवायांना आळा बसण्यास मदत होईल, असे श्री. डिग्गीकर यांनी सांगितले. मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर, अतिक्रमण निर्मूलन कक्षाचे प्रमुख श्री. संदीप कळंबे , मंडळाचे निवासी कार्यकारी अभियंता श्री. प्रकाश सानप, कार्यकारी अभियंता श्री. संजय जाधव आदी उपस्थित होते.

सन २०१८ पासून शासनाने म्हाडास MRTP ॲक्टनुसार विशेष नियोजन प्राधिकरणाचा दर्जा प्रदान केल्यामुळे म्हाडा मालकीच्या जमिनीवरील विनापरवाना बांधकामावर तात्काळ आणि प्रभावी कारवाई करणे अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या माध्यमातून शक्य झाले आहे. नवीन MRTP कायद्यानुसार अतिक्रमण निर्मूलनासंदर्भात अंमलात आणावयाची रीतसर कार्यपद्धती, संलग्न कायद्याचे परिपूर्ण ज्ञान, इतर संलग्नित महत्वाचे कायदे व नियमावली बाबत सर्व माहिती नागरिकांना सुलभरीत्या उपलब्ध होण्याच्या उद्देशाने सदर फलक तयार करण्यात आले असून अतिक्रमण निर्मूलन कक्षाच्या समोरील दालनात दर्शनी भागात दर्शविण्यात आले आहेत. तसेच या फलकांच्या माध्यमातून नागरिकांना विकास नियंत्रण नियमावली २०३४ मधील ठळक तरतुदी , झोपडीधारकाची पात्रता ठरविण्याबाबत नियमावली, मा. उच्च न्यायलायाचे काही महत्वपूर्ण निर्णय, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती, भारतीय दंड संहिता

कायद्यानुसार सरकारी कर्मचाऱ्यांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी केलेले कायदे आदींबाबत नागरिकांना मार्गदर्शन करणारे फलक येथे दर्शविण्यात आले आहेत.

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण





D:\Documents\Press Release\Encroachment removal department board.docx